INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# काँग्रेसपूर्व काळातील महाराष्ट्रातील स्वदेशी-बहिष्काराच्या वाटचालीत गणेश वासुदेव जोशी ऊर्फ 'सार्वजनिक काका' यांचे योगदान

# (Contribution of Ganesh Vasudev Joshi alias Sarvajanik kaka in swadeshi boycott movement before Congress period)

**डॉ. के. डी. सावंत**
इतिहास विभाग प्रमुख,
महिला महाविद्यालय,
गेवराई, जि. बीड (महाराष्ट्र, भारत)
E-mail: Kailassawant09@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/02.2024-82939471/IRJHIS2402020

**प्रस्तावना :**

स्वदेशी – बहिष्काराच्या चळवळीचा कालखंड हा हिंदुस्थानातील स्वातंत्र्य संग्रामाचे एक महत्वपूर्ण पर्व होते. ब्रिटिशांच्या हिंदुस्थानातीलसाम्राज्यामुळे या देशातील राजकीय दास्याबरोबर आर्थिक दुरवस्था वाढीस लागली. हिंदी जनतेने राजकीय दास्य व आर्थिक दुरवस्था संपविण्याच्या उद्देशाने सुरु केलेल्या चळवळीमध्ये स्वदेशी बहिष्काराच्या चळवळीचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण होते. या राजकीय व आर्थिक स्वरुपाच्या चळवळींच्या माध्यमातून हिंदी राष्ट्रवाद साकार झाला. स्वदेशी बहिष्काराची चळवळ हा हिंदी राष्ट्रवादाचा आर्थिक अविष्कार होता. महाराष्ट्रात काँग्रेसपूर्व काळात (इ.स.1885 पूर्वी) स्वदेशी बहिष्कार चळवळीचा उदय व विकास कसा झाला व त्यात गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका यांच्या योगदानाचा आढावा घेणे या संशोधन पेपरचा उद्देश आहे.

**महाराष्ट्रातील स्वदेशी-बहिष्काराच्या वाटचालीची पार्श्वभूमी :**

महाराष्ट्रातील जनतेला सह्याद्रीसारखी उत्तूंग स्वतंत्र वृत्ती व अभेद्य त्यागबुध्दी लाभली असल्याने ब्रिटिश राजवटीत, ब्रिटिशांच्या राजकीय व आर्थिक गुलामगिरीविरुध्द हिंदुस्थानातसुरु झालेल्या प्रत्येक चळवळीमध्ये महाराष्ट्रीय नेते अग्रेसर होते. परिणामी या चळवळीचे धुरीणत्व बऱ्याच वेळा महाराष्ट्रीय नेत्यांकडे आले. हिंदुस्थानच्यास्वातंत्र्यसंग्रामामध्ये विशेष महत्व पावलेली स्वदेशी-बहिष्काराची चळवळ त्याला अपवाद नव्हती.

इ.स.1818 मध्ये पेशवाईचा शेवट झाल्यानंतरमहाराष्ट्रात ब्रिटिश अंमल सुरु झाला. ब्रिटिश अंमलात महाराष्ट्रात शांतता

व स्थैर्य प्रस्थापित झाले. तथापि राजकीय दास्याबरोबरच येथील लोकांची आर्थिक दुरवस्था वाढीस लागली. एतद्देशीय उद्योगात पारंपारिक पध्दतीने तयार झालेला ओबडधोबड व महाग माल यंत्रावर तयार झालेल्या सुबक, आकर्षक व स्वस्त किंमतीत मिळणाऱ्या इंग्लिश मालाशी स्पर्धा करु न शकल्याने व ब्रिटिश राज्यकर्त्यांनी जाणीवपूर्वक देशी उद्योगांना मारक धोरण स्वीकारल्याने देशी उद्योगधंदे बंद पडले. कारागीर बेकार झाले आणि एतद्देशीय खेडयांची पूर्वीची स्वयंपूर्णता संपुष्टात आली. परिणामी एतद्देशीय यांना आपल्या दैनदिन गरजेच्या वस्तू ब्रिटिश व्यापाऱ्यांकडून विकत घेणे भाग पडले, आणि या देशातील संपत्तीचा ओघ इंग्लडकडे सुरु झाला. प्रारंभीच्या काळी ब्रिटिशांच्या पराक्रमामुळे व सर्व क्षेत्रातील श्रेष्ठत्वामुळे सारा समाज भांबावूनगेला. समाजातील विद्वानांनाही देशास्थितीत कोणत्या मार्गाने सुधारणा घडवून आणावी हे सूचत नव्हते. ब्रिटिशांनी या देशात सुरु केलेल्या पाश्चात्य पध्दतीच्या शिक्षणाचा लाभ घेतलेले आचार्य बाळशास्त्री जांभेकर, रामकृष्ण विश्वनाथ, गोपाळ हरि देशमुख, दादाभाई नौरोजी, डॉ.भाऊ दाजी लाड, न्यायमूर्ती गोविंद रानडे त्यातीलच एक गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक कका (इ.स.1828 ते 1880) यासारखे बुध्दीवादी तरुण देशास्थिती व लोकजीवन सुधारण्यासंबंधीविचार करु लागले. तेंव्हा त्यांच्या लक्षात आले की, ब्रिटिश सत्तेचा हिंदुस्थानातराजकीय वर्चस्व स्थापन करण्याचा आणि व्यापाराच्या माध्यमातून नफ्याच्या रुपाने एतद्देशीय संपत्तीची लूट करण्याचा हेतू आहे. ही लूट थांबविण्यासाठी ब्रिटिशांच्या व्यापाराचे खच्चीकरण केले पाहिजे व ते साध्य करण्यासाठी आपल्या देशातील लोकांनी दैनंदिन गरजेच्या वस्तु ब्रिटिशांचेकडून न घेता त्या आपल्या देशात उत्पादित करुन वापराव्यात असे त्यांना वाटू लागले.

वर उल्लेख केलेल्या पाश्चात्य विद्याविभूषित महाराष्ट्रीय तरुणांच्या विचारांनी स्वदेशी बहिष्काराच्या चळवळीची वैचारिक पार्श्वभूमी तयार झाली. या पार्श्वभूमीवर डॉ.भाऊ दाजी लाड यांचे स्वदेशी वस्तु निर्मितीचे प्रयत्न आणि सार्वजनिक काकांच्या स्वदेशी वस्तु वापरण्याच्या निग्रही निश्चयाने व स्वदेशी-वस्तुच्या निर्मितीसाठी आणि प्रचारासाठी त्यांनी केलेल्या अविरत प्रयत्नाने स्वदेशीच्या विचारांना-कृतीची साथ मिळून स्वदेशीची चळवळ दृग्गोचर झाली. काँगेसच्या स्थापनेनंतर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक इ.स.1856-1920 यांच्या नेतृत्वाखाली स्वदेशीला बहिष्काराची साथ मिळाली आणि स्वातंत्र्य संग्रामातील स्वदेशी-बहिष्काराची चळवळ साकारली. या चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधीजींच्या (इ.स.1869 ते 1948) अगोदर सार्वजनिक काका, लोकमान्य टिळक यासारख्या महाराष्ट्रीय सुपुत्रांनीकेले. स्वदेशी-बहिष्कार चळवळीचे स्वदेशी व बहिष्कार हे एकमेकाचे परस्पर-पूरक व अविभाज्य घटक होते. महाराष्ट्रात उगम पावलेल्या व विकसित झालेल्या स्वदेशीच्या विचारातूनच स्वदेशी-बहिष्काराची चळवळ जन्मास आली. या संदर्भात शं.द. जावडेकर म्हणतात, "खादी किंवा स्वदेशी या चळवळी केवळ आकडेमोडीच्या निर्जीव अर्थशास्त्राच्या नसून वाढत्या देशभक्तीतून निर्माण होणाऱ्या लोकांतील प्रत्यक्ष प्रतिकारशक्तीच्या संघटनेच्या या गोष्टी आहेत. या प्रतिकारशक्तीचा जन्म महाराष्ट्रातच यावेळी (इ.स.1896-97) झाला."[1]

**गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका यांचे स्वदेशी-बहिष्काराच्या वाटचालीतील योगदान :**

ब्रिटिश राजवटीमुळे आणि ब्रिटिशांच्या पक्षपाती व्यापार नीतीमुळे देशात निर्माण झालेली आर्थिक दुरवस्था कमी करण्यासाठी आणि देशबांधवांतीलबेकारी व दारिद्रय संपविण्यासाठी इ.स.1872 मध्ये पुण्यातील एक वकील व पुणे सार्वजनिक

सभेचे सरकार्यवाह गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका यांनी न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचेशी वस्तुंचाच वापर करण्याचा निश्चय केला. स्वदेशी वस्तूंच्या निर्मितीचे उद्योगंधदे त्यांनी आपल्या सहकार्याच्या मदतीने सुरु केले. स्वदेशी वस्तूंची दुकानेसहकारी तत्वावर चालविली व स्वदेशी वस्तूंच्या प्रचारासाठी अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. सार्वजनिक काकांच्या या कार्यापाठीमागे व्यापारी दृष्टिकोणाबरोबरच ब्रिटिशांचे राजकीय वर्चस्व संपवावे हा राजकीय विचारही होता. इ.स.1872 पासून तहहयात त्यांनी स्वदेशी वस्तु वापरण्याचे आपले व्रत अत्यंत काटेकोरपणे पाळले. निश्चियपूर्वक स्वदेशी वस्तु वापरणारे स्वदेशी वस्तूंच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणारे वस्तूंच्या वितरणासाठी सहकारी तत्वावर प्रसंगी पदरमोड करुन दुकाने चालविणारे आणि व्याख्यानांच्या आणि लेखनाच्या माध्यमातून स्वदेशी चळवळीचा प्रचार व प्रसार करणारे पश्चिम भारतातील ते पहिले स्वदेशभिमानी देशभक्त होते. 'स्वदेशीचे अग्रदूत' अशा शब्दात श्री.दा.न. शिखरे यांनी सार्वजनिक काकांचा केलेला गौरव यथोचित ठरतो.

सार्वजनिक काकांचे आद्य चरित्रकार श्री.रामचंद्र गणेश बोरवणकर म्हणतात, 'माधवराव पुण्यास येऊन 'सार्वजनिक सभेत' लक्ष घालू लागल्यावर एक दिवस काकांनी त्यांचेपुढेदेशातील वाढत्या दारिद्र्याचे चित्र रंगविले व देशोन्नतिकारक काही उपाय असल्यास सुचविण्याविषयी माधवरावांना विनंती केली पुढे बराच विचार विनिमय होऊन, 'देशीला उत्तेजन देणे' हाच देशोन्नतीचा सुलभ मार्ग आहे असे ठरले. काकांनी लगेच एक 'देशी व्यापारोत्तेजक मंडळ' नावाची संस्था उघडली. परंतु नुसती देशी वस्तूंची दुकाने काढून अगर कोरडी व्याख्याने देऊन भागावयाची नाही, स्वत:च्या आचरणाने जनतेला धडा घालून दिला पाहिजे असे पटताच काकांनी दि.12 जानेवारी 1872 या दिवशी स्वत: देशी कापड वापरण्याची शपथ घेतली, व ती आचरणांत निश्चियाने पाळली."[2]

स्वदेशीचे संपूर्णशुध्द व अंतिम स्वरुप म्हणजे खादी ही खादी एखाद्या व्रताप्रमाणे निश्चियाने वापरणारे सार्वजनिक काका हे पहिले देशभक्त होत. म्हणून त्यांना स्वदेशीचे पहिले पुरस्कर्ते म्हटले जाते. या संदर्भात श्री.दा.न.शिखरे लिहितात, ''त्याप्रमाणे स्वदेशीचे पहिले पुरस्कृर्ते 'सार्वजनिक काका' स्वदेशीचे अंतिम रुप म्हणजे खादी ती एखाद्या धार्मिक व्रताप्रमाणे वापरण्याचा निग्रह त्यांनी केला आणि दिल्ली-दरबारातही तो निग्रह मोठया धैर्याने चालविला. गांधीजींच्या प्रयत्नामुळे खादीच्या चळवळीला महासागराचे स्वरुप आले, पण ते पुढे परंतु खादीची गंगोत्री म्हणजे 'सार्वजनिक काकाच ! महाराष्ट्रातच नव्हे, तर अखिल हिंदुस्थानातहातसुताची व हातविणीची खादी नखशिखान्त पेहरण्याचा पहिला मान 'सार्वजनिक काकाच'"[3]

इ.स.1875 मध्येच सार्वजनिक काकांनी आपल्या मनाशी खूणगाठ बांधली होती की देशाला जर ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त करावयाचे असेल तर 'स्वदेशी' हा त्यांच्यावर जालीम उपाय आहे. सार्वजनिक काकांचा हा विचार त्यांच्या दृष्टेपणाचा द्योतक आहे.[4]

सार्वजनिक काकांनी स्वदेशीच्या प्रसारासाठी केलेल्या कार्याविषयी R.H. Jalbhoy म्हणतात, "In his New Zeal for the good of his country he gradually neglected and ultimatelly even sacrificed, his lucrative profession. He delivered lecture on Indian commerce, the material loss it sustains in its unequal imports and exports,

etc. With the view to encourage native industry he formed association, the member where of bound themselves to use as far as possible all native products, and opened Shopsin Poona, Satara, Nagpur, Bombay, Surat, Ahmadambad etc to sell homemade articles for use."[5]

सार्वजनिक काकांनी आपल्या निश्चयाप्रमाणे जाडीभरडी खादीची वस्त्रे वापरण्यास प्रारंभ केला. दैनंदिन गरजेच्या काही वस्तुंचे उत्पादन अधिक झीज सोसून त्यांनी चालू ठेवले. त्या वस्तूंचे उत्पादन अधिक झीज सोसून त्यांनी चालू ठेवले. त्या वस्तू लोकांनी वापरण्यात यासाठी त्यांनी व्याख्याने दिली व वितरणासाठी दुकाने काढली. तेंव्हा कित्येकांनी सार्वजनिक ककांना चळ लागला आहे म्हणून त्यांचा अपमान केला. हे न्यायमूर्ती रानडे यांना समजल्यावर त्यांनी लोक कसे व कुठे चुकत आहेत हे लोकांना विशद करुन सांगण्याकरीता 'स्वदेशी' या विषयावर दोन व्याख्याने दिली. पहिल्या व्याख्यानात देशातील कामगारांचे दारिद्रय वाढविण्यात व कला कौशल्याचा नाश करण्यास परकीय वस्तूंचा हव्यास कसा कारणीभूत ठरते हे त्यांनी सांगितले. दुसऱ्या व्याख्यानात देशातील व्यापार वाढला असला तरी दारिद्र कमी न होता ते वाढलेच आहे असे कथन केले. "ह्या व्याख्यानांचा परिणाम श्रोतृ-वृंदावर इतका झाला की, कित्येक लोकांनी सभेत उठून आम्ही आजन्म स्वदेशी माल वापरु काटकसरीने राहू आणि देशी कारखाने काढून देशबांधवांच्यापोटाला मिळेल असे काही तरी करुन दाखवू म्हणून शपथा वाहिल्या."[6]

स्वदेशी भाषेत निघणारी वृत्तपत्रे स्वदेशात तयार झालेल्या कागदावरच छापली जावीत असे सार्वजनिक काकांना वाटत होते. ठाणे येथील 'अरुणोदय' वृत्तपत्रात लिहिलेल्या पत्रात सार्वजनिक काका म्हणतात, "आपल्या देशात तयार होणारा कागद जर आपणास पुरेसा असेल तर, '1 जुलै 1873 पासून स्वदेशी-भाषेत निघणारी वर्तमानपत्रे स्वदेशात उत्पन्न झालेल्या कागदावर छापली जावी, भांडवलाची अडचण पडणार नाही – मी व माझे मित्र व्यवस्था करु शिवाय राजे व सरदार यांची मदत मिळवू – इतर वर्तमानपत्रांनीही याच भूमिकेचा स्वीकार करावा."[7]

**सारांश:**

सार्वजनिक काकांची स्वदेशी विषयीची कल्पना व्यापक स्वरुपाची होती. स्वदेशी कापड, स्वदेशी वस्तूबरोबरच त्यांनी स्वदेशी न्याय व्यवस्थेसाठी लवाद कोर्टाची कल्पना मांडली त्यांनी पुणे येथे इ.स.1876 मध्ये लवाद कोर्टाची स्थापना केली. या कोर्टाने खटले आपसात तोडविण्याचे काम चांगल्या प्रकारे केले, तर याचेही पुढे जाऊन इ.स.1880 साली चिपळूणकर, आगरकर व लोकमान्य टिळक यांनी स्वदेशी शिक्षण देणारी शाळा सुरु केली.

**संदर्भसूची:**

1) जावडेकर, आचार्य शं.द.,आधुनिक भारत, दुसरीआवृत्ती, पुणे 1953 पृष्ठ 247.
2) बोरवणकर, रा.ग. महाराष्ट्र- चैतन्य, गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काकांचे चरित्र, प्रथमावृत्ती, ठाणे, 1924, पृष्ठ 21.
3) शिखरे, दा.न.सार्वजनिक काका, (ग.वा.जोशी), प्रथमावृत्ती, मुंबई 1952, पृष्ठ 10
4) खेर भा.द.,लोकमान्य टिळक दर्शन, व्दितीयवृत्ती, पुणे 1972, पृष्ठ 81

5) Jalbhoy R.H., The portrait Gallery of Western India, First Edition, 1886, P.125

6) बोरवणकर रा.ग., उपरोक्त, पृष्ठ 23, 24

7) फडके का.वि., (संपा), अरुणोदय, ठाणे, दि.8 जून 1873, पृष्ठ 2